# शेतकरी संघटक

वर्ष १२ वे
अंक १ ला
२१ एप्रिल १९९५
पाक्षिक
वार्षिक वर्गणी रु. ३०
किंमत १ रूपया २५ पैसे


१२ व्या वर्षात पदार्पण करताना....

## संकल्प आत्मपरीक्षणाचा

६ एप्रिल! शेतकरी आंदोलनातील हुतात्म्यांचा स्मृतीदिन.

१९८३ साली या हुतात्मा स्मृतीदिनी 'शेतकरी संघटक' या पाक्षिकाची सुरुवात झाली. पुढील प्रत्येक वर्षाची वाटचाल या शेतकरी हुतात्म्यांचे स्मरण करून व त्यांना अभिवादन करून आणि शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी सांडलेल्या रक्ताला जागण्याची शपथ घेऊन चालू करीत 'शेतकरी संघटक'ने आपली अकरा वर्षांची मजल मारली आणि या अंकाबरोबर बाराव्याा वर्षाची वाटचाल सुरू होत आहे.

ही वाटचाल सुरू करीत असतांना, शेतकऱ्यांच्या श्रमसिद्ध हक्कासाठी की – जो शेतकऱ्याला स्वातंत्र्याकडे आणि समाजाला समृद्धीकडे नेतो – ज्या शेतकरी भावांनी आत्मबलिदान केले त्यांचे स्मरण करण्याचा, त्यांनी अभिवादन करण्याचा, त्यांच्या रक्ताला जागण्याची शपथ घेण्याचा आम्हाला काही अधिकार आहे का? तशी आमची लायकी आहे का?

हा प्रश्न माझ्यापुढे उभा झाला याचे कारण गेली अकरा वर्षे शेतकरी संघटकने केलेले स्मरण, अभिवादन आणि घेतलेली शपथ ही केवळ व्यक्तिगत नव्हती, केवळ नियतकालिकाची नव्हती तर ती शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सर्व पाईकांच्या वतीने होती. गेली अकरा वर्षे वाहात आलेल्या शपथेशी आम्ही प्रामाणिक राहिलो का? का शपथ वाहणे हा केवळ नैमित्तिक उपचार होता. केवळ, औपचारिकपणे शपथ वाहाण्याने हुतात्म्यांना काय क्लेश झाले असतील ते सोडा, पण गेल्या पंधरा वर्षांत शेतकऱ्यांच्या हितासाठी ज्यांनी ज्यांनी आपले सर्व जीवन उधळून टाकले त्यांना शेतकरी संघटनेच्या गेल्या निवडणूक आंदोलनातील एकूणच उपलब्धीने क्लेश झाले नसतील काय?

दरसाल २४००० कोटी रुपयांचा लुटीचा मुद्दा आम्हाला मशालीसारखा उंच का धरता आला नाही, दरसाल २४००० कोटी रुपयांनी शेतकऱ्यांना लुटणाऱ्या नेहरूव्यवस्थेबद्दल, किमान शेतकऱ्यांच्या मनात आम्ही चीड उत्पन्न का करू शकलो नाही? आमच्या कामात काही कुचराई झाली का? आम्ही फारच लवकर सुस्तावलो, स्थिरावलो आहोत का????

हुतात्म्यांच्या बलिदानाचे, त्यांनी सांडलेल्या रक्ताचे आणि ज्यासाठी त्यांनी आपले रक्त सांडले त्या कारणाचे स्मरण तर आपल्याला सतत राहिलेच पाहिजे; पण नुसत्या स्मरणाने भागणार नाही, आपल्याला आत्मपरीक्षणही करायला पाहिजे आणि त्यासाठी भूतकाळातील सर्व यशापयशांचा आढावा घेऊन वर तयार झालेल्या आणि त्यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. आपण थकलो आहोत असं प्रामाणिक उत्तर आलं तर बाजूला सरकून पुढच्या पिढीला जागा मोकळी करून देण्याचं धारिष्ट्य आणि समजूतदारपणा दाखवायला पाहिजे.

म्हणून 'शेतकरी संघटक'च्या बाराव्या वर्षाची सुरुवात शेतकरी हुतात्म्यांच्या स्मरणाबरोबरच कठोर आत्मपरीक्षण आणि त्या अनुषंगाने उपाय करायचा संकल्प सोडून करू या.

आपला स्नेहांकित,

**सुरेशचंद्र म्हात्रे**

## आता तुम्ही फक्त स्वतःची काळजी घ्या.

**– दोन बहिणींची पत्रे –**

**श्री. शरद भाऊ**

**यांना गरीब बहिणींचा नमस्कार.**

पत्रास कारण की आपल्याला नागपूर येथे हृदयविकाराचा झटका आला हे ऐकून खूप वाईट वाटले. भाऊ तुम्ही, आता स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष द्या. एकवेळ कुत्र्याचे शेपूट सरळ होईल पण शेतकऱ्यांची संघटना होणार नाही, हे तुम्हांला कोणीतरी म्हटले होते ते आता खरे वाटायला लागले आहे. माझ्याच गावात सोळा शेतकऱ्यांचे प्रत्येकी दहा हजार रुपयांचे कर्ज तुमच्यामुळे माफ झाले. असे महाराष्ट्रात कितीतरी शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले तरी त्यांनी तुम्हांला अपमान दिला. निवडणुकीत तुम्हाला अपमान दिला.

लक्ष्मीमुक्ती करून किती लक्ष्मींचा तुम्ही आशिर्वाद घेतला तरी त्यांनी तुम्हाला अपमान दिला.

तुम्ही आता तुमच्या जिवाचे हाल करून शेतकऱ्यांचे, त्यांच्या बायकांचे कल्याण करायचे सोडून द्या. त्यांचे जसे व्हायचे तसे होईल पण आमच्याकरता तुमची रांगोळी करून घेवू नका, तब्येतीला जपा.

मी कुठेतरी वाचल्याचे आठवते, माणसे अपयशी होतात, राजकारण व राजकीय समुहसुद्धा अपयशी होतात पण

विचारांना अपयश नसते. कधीतरी एखाद्या कृतीधीन लक्ष त्या विचाराकडे वळण्याची व त्याला कृतीची जोड मिळण्याची शक्यता असते. अशावेळी त्या विचाराएवढेच त्या विचारवंताचे मोठेपणही सर्वमान्य होते.

तसेच तुमच्या दिलेल्या विचारालासुद्धा मोठेपण थोड्या दिवसातच प्राप्त होईल. म्हणून तुम्ही हे शेतकऱ्यांचे भले करण्याचे काम थांबवा व तुमची तब्बेत सांभाळा.

आपली बहीण,
**पुष्पा संधान**
कुरणोली, ता. दिंडोरी
अंगणवाडी कार्ययुती.

**श्री. शरदभाऊ यांना**

आपली बहिण नानूबाई गवळीचा नमस्कार. पत्रास कारण की आपण नागपूरला हृदयविकाराच्या झटक्याने आजारी पडलात हे समजले, फार वाईट वाटले. आपण आता शेतकऱ्यांसाठी कष्ट करायचे सोडून द्या व आपली तब्बेत सांभाळा. हे शेतकरी नालायकापेक्षा खूप नालायक आहेत. ते फक्त शरद जोशींनी करून दिलेला फायदा फुकट घ्यायला पुढे धावतात, मत द्यायचे म्हटले की त्यांना शिवसेना अन् काँग्रेस आठवते. म्हणून सांगते तुम्ही फक्त तुमची तब्बेत सांभाळा. ह्या शेतकऱ्यांचे हित पहाणे सोडून द्या. आपल्या राज्यापेक्षा दुसऱ्या राज्यात संघटना करा. आपल्या राज्यातले शेतकरी सुधे नाही. त्यांना तुम्ही काम बंद केल्यावर तुमचे ध्यान आल्याशिवाय राहणार नाही. तरी तुम्ही फक्त स्वतःची काळजी घ्या, तब्बेतीची काळजी घ्या.

आपली बहिण,
**नानुबाई गवळी**
मु. आहेरगांव, ता. निफाड, जि. नाशिक.

# वसुलीसाठी त्यांच्या घरातून काय जप्त करतात?

पुण्याच्या दै. सकाळच्या २८ मार्च १९९५ च्या अंकात खालील बातमी वाचावयास मिळाली.

## बारा नेत्यांकडे ४९ लाखांची थकबाकी

संसद सदस्य, राजकीय नेते यांच्या निवासस्थानांच्या संदर्भात असलेल्या घरभाड्याच्या थकबाकीचा तपशील आज लोकसभेला देण्यात आला असून, बारा नेत्यांकडून एकूण ४९ लाख ४६ हजार ९६१ रुपये इतके येणे आहे, असे म्हटले आहे.

त्या नेत्यांत, शरद पवार (६ लाख ७१ हजार ८७० रु.), एम. एम. अली खान (३ लाख ७३ हजार ४७७ रु.) एम. एम. जेकब (३ लाख ५९ हजार ११३), बी. एम. पांडे (३१ हजार २४५), पं. रवि शंकर (३ लाख ७६ हजार ८३२), मुरलीधर भंडारी (१ लाख ६८ हजार २०६), डॉ. सुब्रमण्यम स्वामी (३ लाख ६० हजार २४८), कमल मोरारका (१५ हजार ८१३), (कै.) दरबारसिंग यांचे कुटुंबीय (१८ लाख ५९ हजार ९३५), के. सी. लेंका (१४ हजार ७२१), एच. के. एल. भगत ( ४ लाख ६९ हजार ६८०) यांचा समावेश आहे. वरील थकबाकी २८ फेब्रुवारी ९५ पर्यंत येणे आहे.

या व्यतिरिक्त भारतीय सांस्कृतिक संबंध मंडळाचे अध्यक्ष वसंत साठे यांच्याकडून १३ हजार ४५१ रुपये येणे आहे. वरील माहिती नगर विकास राज्यमंत्री नी. के. थुंगन यांनी आज लोकसभेमध्ये जीवन शर्मा यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.

या व्यतिरिक्त माजी खासदार, माजी राज्यपाल, काही महत्त्वाच्या व्यक्ती व माजी उच्चाधिकारी यांनी बेकायदेशीररित्या सरकारी घरांचा कब्जा केला असल्याची माहिती ललित ओराओन यांनी विचारलेल्या आणखी एका प्रश्नाला उत्तर देताना श्री. थुंगन यांनी दिली. त्यामध्ये अठरा जणांचा समावेश असून, के. सी. लेंका, पंजाबचे माजी राज्यपाल सुरेंद्रनाथ यांचे कुटुंबीय, ईशान्य भागातील माजी राज्यपाल भीष्मनारायण सिंग, माजी उपपंतप्रधान देवीलाल तसेच (कै.) जगजीवनराम यांची पत्नी इंद्राणीदेवी, चित्रा नारायण, एस. कानुंगो, रवींद्र नायक, एस.बी. रमेश बाबू, सी.बी. गौतम, एच.एन. शर्मा, आर.सी. जैन, एस.के. पांडे, एस.डी. शर्मा, एस.के.एन.नायर, बी. सामस्या, एस.बी. बागला आणि एम.सी गुप्ता यांची नावे आहेत.

*(सकाळ, २८-३-९५)*

दरवर्षीच अशा प्रकारच्या बातम्या वाचावयास मिळतात. त्याशिवाय सिनेमा नटनट्यांकडील आयकर थकबाकीच्या स्वर्गीय रकमा, कारखानदारांची थकीत कर्जे याबाबतच्याही बातम्या वेळोवेळी वाचावयास मिळतात. पण, या महाभागांच्या, त्यांच्याकडून येणे असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी कोर्टात खटले लागल्याच्या किंवा अगदी जप्ती येऊन घरची भांडीकुंडी उचलून नेल्याच्या बातम्या कुठे वाचनात किंवा ऐकण्यात येत नाहीत.

सरकार शेतकऱ्यांचे दरवर्षी चोवीस हजार कोटी रुपये लुटते हे केंद्र शासनाने गेल्या वर्षी गॅटसमोर मान्य केले तरीही अजून हजार पाचशेच्या तथाकथित थकबाकीसाठी गावोगाव शेतकऱ्यांच्या घरची भांडीकुंडी उचलून नेण्याचे प्रकार या लुटारू सरकारचे हस्तक अधिकारी करीतच आहेत.

वरच्या 'महाजन' देणेकऱ्यांकडून वसुलीसाठी काय मार्ग अनुसरला जातो याबद्दल, म्हणूनच कुतूहल आहे.

**सौ. जयश्री प्रकाश पाटील**
चोपडे, जि. जळगाव.

# स्वतंत्र भारत पक्षाला मतदारांनी का नाकारले ?

**६ मार्च ९५ च्या अंकात या विषयी आपली मते कळविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला प्रतिसाद म्हणून शेतकरी संघटककडे शंभरेक पत्रे आली आहेत. त्यातील काही निवडक पत्रे तसेच श्री. शरद जोशी यांना स्वतंत्रपणे पाठविलेली तीन सविस्तर पत्रे चर्चेसाठी येथे प्रकाशित आहे. पुढील अंकात इतर पत्रांचे संकलन केले जाईल.**

## निवडणुकीचे तंत्रच वेगळे असते

निवडणूक ही अत्यंत भिन्न बाब आहे. निवडणूक हे रसायन असून त्याबाबत काही ठळक सिद्धांत किंवा नियम मांडता येतील पण ती सर्व ठिकाणी व सर्वच स्तरावर लागू होतील असे मात्र वाटत नाही.

निवडणुकीत उमेदवार एक व मतदार असंख्य असतात. ह्या असंख्यांचा दृष्टीकोनही अत्यंत भिन्न असतो. कुणी उमेदवार गावाचा म्हणून, कुणी जातीचा म्हणून, कुणी धर्माचा म्हणून, कुणी उमेदवाराचा स्वभाव म्हणून तर चारित्र्य म्हणून मतदान करतात. कार्यक्रम व सिद्धांताच्या आधारे ह्या देशांत कधी निवडणूक झाल्याचे आठवत नाही. उमेदवारांना वेगवेगळ्या नजरेतून पाहिले जाते त्यामुळे मतदारांनी का नाकारले हे सांगणे अवघड व कठीण आहे. तरीपण सर्वसाधारण स्वरूपाची कारणे खालीलप्रमाणे असावीत असे वाटते.

१) 'स्वतंत्र भारत' हा नवा पक्ष होता. त्याचा प्रचार व प्रसार झालेला नव्हता. तसेच ह्या पक्षाला निवडणूक आयोगाची मान्यता नव्हती. 'स्वतंत्र भारत'चे उमेदवार हे स्वतंत्र उमेदवार होते.

२) पक्षाला मान्यता नसल्याने समान चिन्हाची सवलत मिळाली नाही. समान चिन्ह नसल्याने एकसंघता किंवा पक्ष, गट असा मतदारांना विश्वास वाटला नाही.

३) 'स्वतंत्र भारत'च्या उमेदवारांकडे साधन व पैशाची अत्यंत उणीव होती. त्याचबरोबर निवडणुकीचे तंत्र अवगत नव्हते व हे तंत्र वापरणे साधनशुचितेच्या मर्यादित बसणारे नव्हते.

४) भ्रष्टाचारी, गुंडगिरी करणारी कॉंग्रेस व जातधर्माच्या प्रचार करणारी 'शिवसेना-भाजप'युती ह्याला 'स्वतंत्र भारत' हा समर्थ पर्याय आहे असे लोकांना वाटले नाही. तसा विश्वास निर्माण होऊ शकला नाही.

५) 'स्वतंत्र भारत'चा कार्यक्रम हा पूर्णपणे आर्थिक होता व आहे. ह्या कार्यक्रमाचे महत्व लोकांना पटले नाही. हा कार्यक्रम देश घडविणारा असला तरी त्यांत मतदारांना ताबडतोबीने लाभ वाटला नाही. ह्यावर लोकांनी मुळीच विश्वास ठेवला नाही. हे मतदारांना दिवास्वप्न वाटले.

६) 'स्वतंत्र भारत'च्या तीस कलमी कार्यक्रमाला नोकरशाहीचा जबर विरोध झाला. नवा पक्ष संरक्षणाची हमी काढून घेणार ही धास्ती वाटत होती.

७) 'स्वतंत्र भारत' उमेदवारांनी स्थानिक व लोकजिव्हाळ्याच्या प्रश्नांना प्रचारांत स्थान दिले नव्हते.

८) शरद जोशी ह्यांची निवडणूक विषयक भूमिका ह्याबाबत जनतेच्या मनात असलेला अविश्वास 'मत मागायला येणार नाही' असे सांगत स्वीकारलेली उमेदवारी व त्यामुळे निर्माण झालेला गैरसमज.

९) शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत हे दोन्ही एकच आहे. त्यांचा कार्यक्रम फक्त शेतकऱ्यांचाच आहे व इतरांना काही स्थान नाही असा झालेला समज व त्यातून शहरी भागातून झालेली पिछेहाट.

१०) गैरशेतकरी वर्गात धान्य महाग होणार हा झालेला प्रचार व त्यातून भूमिहीन मजुरांत निर्माण झालेला दुरावा.

११) नेहरू घराण्याचे पुतळे पाडण्याची केलेली घोषणा ही अनेकांना न आवडलेली बाब.

ह्यासोबतच आचारसंहितेच्या पालनासाठी सरकारी यंत्रणेची कमतरता व निश्चित अशा उपाययोजनेचा अभाव, ही बाबसुद्धा विचारात घेण्याजोगी आहे. तरुणवर्गाला 'स्वतंत्र भारत'चा कार्यक्रम आकर्षित करू शकला नाही. तरुणांना नोकरीचा प्रश्न विशेष महत्त्वाचा वाटत होता.

**मोरेश्वर टेमुर्डे (पाटील)**
संयोजक, स्वतंत्र भारत,
महाराष्ट्र राज्य.

## हा पाच वर्षानंतरचा विजय आहे

कोण बोलत आहे की मतदारांनी आमच्या स्वतंत्र भारत पक्षाला नाकारले; कोणी नाही फक्त खेडे गांवातील शेतकरी बांधवांना व बहिणींना त्यांच्यात भाषेत समजावून सांगितले तर ते समजतात, मतदार समजले म्हणून मला ८५८ मत प्राप्त झाले मी ह्या पक्षाची व मतदाराची आभारी आहे. एक महिन्यांत ८५८ मत तर पांच वर्षात ८५८×१२×५ = ५१,४८० मते घेण्याची क्षमता आमच्या पक्षाला आहे. आमच्या पक्षाचा जन्म आताच सहा महिन्यापूर्वी झाला आहे. हा पक्ष चमकणार व पुढे शेतकरीच प्रांताचा राजा होणार. फक्त पक्षअध्यक्ष व जिल्हाअध्यक्षांनी पक्षाकरिता फक्त कार्य करावे व सत्ता आपल्याकडे ठेवावी.

आपली बहिण
**सौ. कांताबाई तिघारे (उमेवार)**
मु.पो. कुडवा, ता. गोंदिया, जि. भंडारा.

# चळवळीतील त्रुटींचे आकलन व्हावे

शेतकरी स्वातंत्र्याचे उद्‍गाते, प्रणेते, परमादरणीय मा. शरद जोशी, साष्टांग नमस्कार वि. वि.

या आगंतुक, अनाहूत पत्रामागची भूमिका स्पष्ट व्हावी यासाठी आधी माझी ओळख सांगतो. मी आपल्या शेतकरी आंदोलनाचा अभ्यासक आणि पुरस्कर्ता आहे. शेतकरी संघटकचा वाचक आहे. १९८३-८४ साली काही वेळ आपल्या कार्यकर्त्यांबरोबर फिरलोही आहे. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी टेहेरे (नाशिक) येथे सांगता झालेल्या प्रचारयात्रेत कन्नडपासून मी सहभागीही झालो होतो. नंतर भारतातून इंडियात नोकरीला आलो आणि चळवळीतला प्रत्यक्ष सहभाग संपला. पण आंदोलनाच्या वाटचालीवर माझं सतत लक्ष असतं. औरंगाबादच्या कार्यकर्त्यांकडून मला आपले साहित्य, भाषणाच्या कॅसेट, संकलित वृत्तपत्रीय लेखाची पुस्तके, झेरॉक्स मिळाल्याने आपल्या चळवळीपासून दूर राहूनही संपर्क तुटलेला नाही. आपले जे विचार पटले त्यांचे मनन-चिंतन करून काही लेखही स्थानिक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असतात. इतरही लिखाण करतो.

आता मूळ विषयाकडे वळू. आपल्या कामाचे दोन दृष्टिकोनातून आकलन करण्याचा माझा प्रयत्न असतो. एकतर शेतीच्या लुटीच्या अर्थशास्त्राची अत्यंत तर्कशुद्ध आणि साधार मांडणी करून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा विचार रुजवणे आणि दुसरा, 'बळीराज्य' प्रत्यक्षात आणण्यासाठी चळवळीची वाटचाल चालू ठेवण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे.

पहिल्या मुद्द्याबाबत माझे मत स्पष्ट आहे. आपली शेतीच्या लुटीच्या अर्थशास्त्राची मांडणी कोणालाही खोडून काढता येत नाही. त्याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे तसा अभ्यासपूर्वक प्रयत्नच कोणी करत नाही. १ फेब्रुवारी १९९५ रोजी औरंगाबादच्या दै. महानगरमधे लेख लिहून मी 'डरपोकांना काय जोडे हाणावेत?' अशा शीर्षकाखाली या प्रश्नाचा उहापोह केला आहे. त्याला साधा दोन ओळींचा प्रतिवाद करणारा कोणी महाभाग भेटला नाही.

डंकेल प्रस्तावाच्या निमित्ताने श्रीनिवास खांदेवाल्यांनी तसा आव आणला असला तरी त्यात शुद्ध दृष्टीचा अभाव असल्याने फारसे काही सापडत नाही. शेतकरी संघटनेचे अर्थशास्त्र या पुस्तकात डॉ. वि. म. दांडेकरांबरोबर थोडा व बऱ्यापैकी वाद-संवाद घडल्याचे दिसते. परंतु आपले विचार खोडणे जमलेले नाही. अशी आणखीही काही उदाहरणे देता येतील. परंतु त्यातून आपले विचार अधिकाधिक स्पष्ट आकलन होतात, बुद्धीला पक्के आधार सापडतात.

बाकीचे इंडियन विरोधक तर मूळ मुद्द्याला स्पर्शही न करता काहीही बाष्कळ टीका करतात. त्यातून त्यांचे अज्ञान आणि पूर्वग्रहच स्पष्ट होतो. अशा बाष्कळ टीकाकारांचाही समाचार मी घेतला आहे. तात्पर्य असे की, आपल्या आर्थिक मांडणीशी मी संपूर्णपणे सहमत आहे. आणि माझी अशी समजूत आहे, की कुठलाही प्रामाणिक विचारवंत सहमत होईल.

पण आपल्या दुसऱ्या मुद्द्याबद्दल मात्र असे ठामपणे काही म्हणवत नाही. हे पत्र लिहिण्याचा हेतू त्यासंबंधी आपल्यापाशी मन मोकळं करावा हा आहे. आपल्यासारख्या सतत काही ना काही व्यापात असलेल्या माणसाला केव्हाही उठून त्रास देऊ नये या विचाराचा मी आहे. म्हणून गेली बारा वर्षे आपल्या चळवळीशी संबंध ठेवूनही आपल्याशी विनाकारण संपर्क करण्याचा प्रयत्न मी केला नाही. यापुढेही करणार नाही. पण आज त्याला अपवाद करतो, कारण राहवत नाही.

निवडणुकांचा उपयोग आंदोलन प्रभावी करण्याचे हत्यार म्हणून करायचा हा आपला विचार बरोबर असला तरी प्रत्यक्षात आपण जेव्हा राजकारणावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या चाली रचल्या तेव्हा हे हत्यार वरचेवर निष्प्रभ ठरत असल्याचेच दिसत आहे. या विधानसभा निवडणुकीने तर अगदीच निराशा पदरी आली.

आपला स्वतंत्र भारत पक्ष पहिल्याच निवडणुकीत सत्ताधारी होईल ही अपेक्षा खुद्द आपणही ठेवली नसणार. पण सत्ताधारी पक्षाचे रिमोट कंट्रोल पक्षाच्या ताब्यात येईल असा विश्वास मात्र जरूर वाटत होता. त्यासाठी आपण स्वतःलाही दोन मतदार संघांतून पणाला लावले होते. पण एकूणच मतदानाचे चित्र विचित्र आहे. निसटते बहुमत मिळून का होईना सेना-भाजप युतीचे मंत्रीमंडळ सत्तेवर आले आहे. लोकांनी काँग्रेसला नाकारले आहे आणि अन्य पर्याय नसल्याने नाईलाजाने युतीला स्वीकारले आहे.

आपण नागपूर अधिवेशनात ज्यांना देशद्रोही म्हटले ते मंदीरवादी, मंडलवादी आपापली सत्तेची बेटं तयार करण्यात यशस्वी होत आहेत आणि यात ज्याच्याकडून काही वेगळी अपेक्षा होती तो स्वतंत्र भारत पक्ष काहीही निर्णायक भूमिका बजावण्याच्या अवस्थेत नाही, याचा मला मनातून खूप विषाद वाटतो आहे. या पिछेहाटीचे आकलन मांडण्याचा मी प्रयत्न करू इच्छितो.

निवडणूक प्रचाराच्या काळात काही कार्यकर्त्यांशी बोलण्याचा योग आला. त्यांच्या आपसातल्या चर्चाही ऐकल्या. त्यातून स्पष्टपणे असे जाणवले की कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण कमी पडले आहे. जे प्रश्न आणि शंका त्यांनी प्रचारात उतरण्यापूर्वीच विचारून घ्यायला हव्या होत्या त्या ते लोकांकडून उलटसुलट प्रश्न विचारले गेल्यानंतर प्रचार कार्यालयात येऊन विचारतांना दिसत होते. असे गोंधळलेले कार्यकर्ते मतदारांवर काही प्रभाव पाडू शकणे शक्यच नव्हते.

आपल्या कार्यकर्त्यांना मुळात अभ्यासाची आवड निर्माण झालेली दिसत नाही. शेतकरी संघटकचं वाचन यथातथाच दिसले. तसेच संघटनेच्या विचारावर वर्तमानपत्रातून काय टीका येते आहे, तिचा परिणाम मतदारांवर काही दिसतो का याकडे जवळपास दुर्लक्षच झालेले दिसते.

खरेतर उणे सबसीडीचा मुद्दा फार स्फोटक ठरू शकणारे हत्यार होते. पण त्याच्या वापराचे प्रशिक्षणही अपुरेच वाटले.

त्यामुळे प्रत्यक्ष मतदारांनी केलेल्या पुढच्या चौकशांना कार्यकर्ते नीटपणे तोंड देऊ शकलेले नाहीत.

शेतीमालाच्या प्रश्नावर लाखाच्या संख्येने आंदोलन, अधिवेशनात सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात सेना-भाजपच्या हिंदुत्ववादाबद्दल अजूनही मोठा सॉफ्ट कॉर्नर आहे. अगदी संघटनेचे कार्यकर्तेही खाजगीत 'मुसलमान हा आपला शत्रू' या विषयावर सहमती दाखवणारे बोलतात. ही सहमती मतदानातून बाहेर पडली यात संशय नाही.

भावनेच्या लाटेत वाहून जाण्याचा गुण हा भारतीय शेतकऱ्याचा मोठाच अवगुण आहे. १९८५ साली त्यापायीच त्यांनी पायावर धोंडा पाडून घेतला. आताही तेच झाले. पण आपल्या आवाहनाकडे दुर्लक्ष करण्याचे तेच एक कारण असते का? आपले आवाहन त्यांच्या अनुभवाशी विसंगत असे काही करायला तर सांगत नाही ना? या प्रश्नावर खोलवर विचार करायची वेळ आली आहे, असे मी नम्रपणे सुचवू इच्छितो. त्यासाठी त्यांचे अनुभव मोकळेपणाने समोर आणण्याचा काहीतरी व्यापक स्वरूपाचा उपक्रम हाती घेतला जावा असे वाटते.

अनुभव समोर आले की अनुभवाचा अर्थ कसा काढायचा याला दिशा मिळेल. एकाच अनुभवाचे वेगवेगळे अर्थ जो तो आपल्या ज्ञानाच्या आणि मनाच्या, बुद्धीच्या कुवतीने काढत असतो.

अंगात ताप भरला तर तो दैवी कोपाचा परिणाम आहे, किंवा भुताटकीचा प्रकार आहे, किंवा काही करणीधरणी, जादूटोणा आहे इथपासून तर दूषित अन्नपाण्यातून रोगजंतूंचा शिरकाव झाल्याने उत्पन्न झालेला रोग किंवा निव्वळ मानसिक तणावामुळे उत्पन्न झालेला ताप अशी अनेक आकलने समोर येतात. पण त्याआधी ताप आला आहे एवढे तर समोर यायला पाहिजे.

एकदा ताप आल्याचे कळले की मग त्याची लक्षणे, त्यावरून निदान आणि नंतर औषधोपचार ठरतात. तसंच आधी शेतकऱ्यांचे अनुभव त्यांच्या परीने समोर यावेत, त्याच्या मागच्या कारणाचं त्यांचं आकलन ऐकून घेतलं जावं. नंतर खरं निदान होऊ शकेल आणि योग्य औषधही देता येईल. ते न होता एखाद्याला 'छे, हा निव्वळ तुझ्या मनाचा खेळ आहे.' असे म्हणून उडवून लावले तर त्याची अंधश्रद्धा दृढ होण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणे सेना-भाजपचा हिंदुत्ववाद हा निव्वळ जातीयवाद आहे असे म्हटलं की कोणाला त्याबद्दल विश्वास वाटत नाही. हिंदुत्ववाद हा जातीयवाद नाही याची काही शेलकी उदाहरणे त्यांच्या नेत्यांनी नेहमी तयार ठेवलेली असतात. जातीयवादाचे छुपे स्वरूप सामान्यांना कळत नाही. गर्दी गोळा करण्यासाठी गारुडी डमरु वाजवतो पण नंतर खेळात अनेक प्रकारच्या करामती करून दाखवतो. लोकांना नुसते त्या डमरूचे आकर्षण असते का? नाही. डमरू तर फक्त गर्दी जमवायचे साधन असते. त्याचप्रमाणे मुस्लीमद्वेष हा सेना-भाजपचा डमरू आहे. गर्दी जमल्यावर ते बरंच काही इतरही सांगत असतात. हिंदुत्ववाद्यांना जातीयवादी म्हणणे काय अन गारुड्याला डमरूवादी म्हणणे काय, दोन्हीही ठिकाणी आपण त्यांच्या अनुभवापर्यंत न पोहोचता बोलतो असेच त्यांना वाटते. गारुड्याच्या करामतीतली जादू खरी की हातचलाखी खरी हे शोधून सत्य जनतेला पटवून देण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांना त्या त्या अनुभवाशी भिडावे लागते. हिंदुत्ववाद्यांचा छुपा जातीयवादही असाच आहे. त्याचे सत्य आकलन शेतकऱ्यांना होणे अवघड आहे.

आपले काम किती चांगले हे दाखवायच्या नादात कार्यकर्ते कधीकधी दुसऱ्याचा चेहरा ओरबाडून आपला मुखवटा सजवतात आणि त्यामुळे ओरबाडले गेलेले चेहरे चळवळीचा विचार पटत असूनही दुरावत जातात. हा माझा स्वतःचा अनुभव आहे. आपल्या कामाचे श्रेय चोरलेले कोणालाच आवडत नाही, ओरबाडलेले तर मुळीच खपत नाही; हा मनुष्य स्वभावाचा भाग आहे. माझ्या सूचक शब्दांचा अर्थ आपण ओळखलाच असेल. चळवळ पुढे नेताना असे दुरावलेले चेहरे परवडत नाही. अशा अतृप्त आत्म्यांची भुतं होतात आणि चांगल्या कार्यकर्त्यांना पछाडतात. हे सत्य आपल्या लक्षात आले की नाही मला माहीत नाही.

आपल्या व्यासपीठावर सगळे थोर चोर आळीपाळीने येऊन गेले. त्यात आपली रणनीती काहीही असो पण एकाची संगत, दुसऱ्याशी काडीमोड हे आळीपाळीने अनेकांच्या बाबतीत घडले. त्याचा अर्थ प्रत्येक वेळी शेतकऱ्यांना समजू शकला नाही. त्यामुळे शेतकरी गोंधळले असेही घडले आहे.

अगदी अलीकडचे उदाहरण जनता दलाचे घेता येईल. व्ही. पी. सिंगाचे सरकार असताना आपण त्यांच्याबरोबर होतात, आता काडीमोड आहे. जनता दलाच्या एका उमेदवाराला मी विचारले असे का? तर त्याने सांगितले की खुल्या आर्थिक धोरणाला आमचा विरोध आहे आणि शरद जोशींचा पाठिंबा आहे म्हणून आमचे पटत नाही. आपल्या नागपूर अधिवेशनातील भाषणात आपण 'मंडलवादी देशद्रोही' या शब्दावर जोर दिला आहे. खुल्या धोरणाचे विरोधक म्हणून जोर नाही. दोन्ही बाजूंचा जोर वेगवेगळ्या मुद्द्यावर दिसतो. किमान सहमतीवर आधारित युती अस्तित्वात आली नसती का? बिलोली मतदारसंघात आली मते आणि जनता दलाच्या उमेदवाराची मते यांची बेरीज खतगावकरांच्या मतांपेक्षा जास्त येते, हेही सूचक नाही काय? मोठ्या चोराला छातीवरून उतरवण्यासाठी छोट्या चोराची मदत घ्यायची हे आपलेच वाक्य आहे. मग एवढ्या निवडणुकीपुरती जनता दलाशी युती करून काहीतरी साध्य झाले असते असे वाटते.

या आधीच्या विधानसभा निवडणुकीत आपण जातीयवाद्यांना विरोध करण्याची नीती असल्याचे सांगून विविध पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा घोषित केला. त्यात जातीयवादी पक्षाचा म्हणजे भाजपचाही उमेदवार होता. जातीयवाद पोसण्यात तसूभरही कमी नसलेल्या कॉंग्रेसचाही उमेदवार होता. याचा अर्थ मलाही कळला नाही. अन् आपल्या शेतकऱ्यांनाही नाही. उलट, आपला राजकारणावरचा दबाव कमी झाला. त्याचा अपप्रचार करून विरोधक आजही शेतकऱ्यांना गडबडून टाकतात. आपल्या राजकारणातील चाली सुस्पष्ट

असाव्यात अशी अपेक्षा करणे अवाजवी ठरू नये.

सामान्य शेतकरी शेतकरी संघटनेच्या आवाहनाला थंड प्रतिसाद देतो त्याचे अजूनही एक कारण आहे. अतिउत्साहाच्या भरात सत्य परिस्थिती फुगवून सांगण्याचा मोह तालुका, जिल्हा पातळीवरच्या प्रमुखांना होतो. हा फुगवट्याचा प्रकार एकदा का शेतकऱ्यांच्या लक्षात आला की त्याने पुढे खरीही माहिती दिली तरी सामान्य लोक त्याला आपल्या हिशेबाप्रमाणे गुणून किंवा भागून घेतात. त्याचे उत्तर जर अवास्तव किंवा निराशाजनक वाटले तर त्यांचा एकूणच चळवळीवरचा विश्वास उडतो.

चळवळीतील काही त्रुटींचे आकलन असे आहे. चळवळ अधिक प्रभावी होण्यासाठी यावर उपाययोजना शोधली जावी या हेतूने हे सगळे लिहिले आहे. या मुद्द्यांचा आपणही विचार केला असेलच.

आपली चतुरंग शेतीची कल्पना, सीताशेती, माजघर शेती हे उपक्रम खूप आवडतात. शिवार लिमिटेड मागची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी केलेली भाषणे तर आमच्या इंडियाच्या कारखानदारांनी ऐकावी अशी आहेत. माझ्या कंपनीला ISO–9001 प्रमाणपत्र मिळालेले आहे. पण Quality पूर्वीपेक्षाही गचाळ आहे. GATT ची अंमलबजावणी होऊन स्पर्धेत उतरताना सगळ्या इंडियन कारखानदारांची दमछाक होणार, त्यातून माझ्याही कंपनीला जावे लागणार आहे. तरीही स्वदेशीच्या मुद्द्याला जिवंत करण्यासाठी मंत्रपाठ करणाऱ्याच्या मी संपूर्ण विरोधात आहे. आमच्या स्वदेशीचा आम्ही केव्हाच खून केला आहे. शेती सोडता कुठलीच कारखानदारी स्वतंत्र तंत्रज्ञान घेऊन उभी नाही. Collaboration किंवा सरळ चोरी हीच आमची 'स्वदेशी' आहे. तिला जगवायचे म्हणजे काय करायचे कुणास ठाऊक? नाहीतरी आता करायचे हातात काय उरले आहे? असो.

माझ्या पत्राचे सविस्तर उत्तर मी अपेक्षित नाही. पण आपल्या व्यापातून वेळ काढून पोच तरी जरूर द्यावी ही विनंती. मी मांडलेले मुद्दे अपूर्ण असतील पण कार्यकर्त्यांना मोकळेपणाने बोलण्याची संधी देऊन काही दिशा सापडेल या अपेक्षेपोटी पत्र लिहिले.

आपल्या स्वतंत्र भारतच्या जाहिरनाम्यावर मनन चिंतन करीत आहे. माझी पत्नी सौ. संगीताही संघटनेच्या विचारात रस घेते.

बाकी सर्व क्षेम,

कळावे,

आपला

**नवनाथ बंडू पवार**

द्वारा, पेंब्रील इंजिनिअरींग प्रा. लि.

चिकलठाणा, औरंगाबाद.

# समाजाची विवेकशक्ती खालावली आहे?

**आदरणीय मा. जोशीसाहेब**

**स. प्रणाम**

बरेच दिवसांनंतर आपणास पत्र लिहीत अहे. निवडणुकीनंतर आपणास पुन्हा एकदा ॲटॅक आल्याचे एकून फारच दुःख झाले. मी सध्या आपल्या संघटनेचे काम करीत नाही. तेव्हा आपल्याविषयी माझ्या मनात असलेल्या प्रेमादराविषयी आपण शंकाही व्यक्त केली तरी मी रागावणार नाही. निवडणुकीत आपला पराभव झाल्याचे ऐकून तर अक्षरशः धक्काच बसला. खरेतर आपणासारख्या द्रष्टेपण, प्रतिभा व प्रमाणिकपणा याचा एकत्र मिलाफ असलेल्या व्यक्ती अतिशय दुर्मिळ असतात. म्हणून आपणासारख्यांना समाजाची गरज नसून समाजासाठी आपली गरज आहे हे न ओळण्याइतका समाज नतद्रष्ट झाला आहे की काय याचे मनस्वी दुःख होते. एक तर आपणासारख्याने निवडणुकीच्या राजकाणात स्वतः उतरण्याचा निर्णय घेणे ही निदान आपण उभ्या असलेल्या मतदार संघातील जनतेने तरी संधी मानायला हवी होती व अत्यंत विक्रमी मतांनी आपणास विजयी करायला हवे होते. मी हे आपणाविषयी लिहीत असताना कदाचित मी रहात असलेल्या मतदार संघातही आपण अशी संधी दिली असती (प्रत्यक्षात रिझर्व सीट असल्यामुळे ते शक्य नव्हते तरी कल्पनेसाठी मी म्हणतो आहे) तरी मी स्वतःही असाच नतद्रष्ट वागलो असतो की काय एवढा स्वतःबद्दलही विश्वास वाटू नये एवढी समाजाची विवेकशक्ती खालावलेली आहे की काय असे आत्मपरीक्षणांती वाटू लागते.

आजच्या अतिशय गतिमान युगात महाराष्ट्राच्या असेंब्लीमध्ये २८८ च्या संख्येत केवळ आपणासारखा एक कृतीशील प्रतिभावान व प्रामाणिकपणा यांचा मिलाफ असलेला नेता असता तर या महाराष्ट्राच्या असेंब्लीच्या गळ्यातील तो एक अलंकार ठरला असता याबद्दल माझ्यासारख्याच्या मनात संदेह नाही.

कदाचित माझ्या आंतरिक शोधाच्या अपुऱ्या सामर्थ्यामुळे अगर कसे परंतु अद्यापतरी मी देव, धर्म, दैव अगर तत्सम गोष्टी मानीत नाही. परंतु दैव, प्रारब्ध, नियती, इतिहास हे जर पर्यायवाची शब्द असतील तर सध्या मानवी कृतींच्यापेक्षा नियती वरचढ आहे की काय असे वाटू लागते. आणि कुठल्याही आंदोलनाशिवाय रशिया कोलमडणे तसेच मुक्त अर्थव्यवस्था व गॅट करार अगतिकतेने भारताला स्वीकारणे भाग पडणे ह्या इतिहासाच्या गतीच्या बरोबरीने किंबहुना त्यापुढे आपली गती ठेवणाऱ्या आपणासारख्या द्रष्ट्या व्यक्तिमत्वाचे केवळ अस्तित्वही आवश्यक व प्रेरणा देणारे आहे. म्हणून आपले आयुष्य वाढावे ही तीव्र मनोकामना व्यक्त करीत आहे व आपल्या प्रकृतीचे क्षेमकुशल अधिकृतपणे मला कळाले तर आनंद वाटेल.

आपला चाहता

**दशरथ सावंत**

अध्यक्ष,

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी,

मु. पो. रुंभोडी, ता. अकोले,

जि. अहमदनगर.

# अवास्तव उमेदवार उभे केले

**आदरणीय नेते श्रीयुत शरद जोशी यांसी सप्रेम नमस्कार**

आपण प्रकृती अस्वास्थ्यामुळे आजारी असल्याचे वाचले. त्वरीत पत्र लिहिण्याचा विचार होता. परंतु महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीमुळे मी सुन्न झालो होतो. परंतु परिस्थितीशी ॲडजेस्ट होऊ लागलो आहे. माझी खात्री झाली आहे की मतदान हे वैचारिक तत्त्वज्ञानावर न होता काही विशिष्ट घटनांचा तात्कालिक परिणाम झाला आहे. शासनाने मुंबई दंगल, डॉ. आंबेडकर विद्यापीठ नामकरण, गोवारींची इत्यादि प्रकरणे योग्य रीतीने हाताळली नाही. त्याचा परिणाम मतदानावर झाला. स्वतंत्र भारत पक्षाने काँग्रेस पक्षाशी सहकार्याची भूमिका जाहिर केल्यामुळे सत्ताधारी पक्षाबरोबरच पडझड झाली.

आपण शेतकरी संघटना चालविताना राजकारण हे दुय्यम बाबत म्हणून स्वीकारली होती. त्यामुळे यापूर्वीच्या राजकीय पराभवाचा शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमावर कोठलाच परिणाम झाला नसल्याचे दिसून आले. शेतकरी संघटनेची कोणतीच राजकीय शक्ती नसताना आपण अनेक शेतकऱ्यांच्या प्रश्नाना देशाच्या वेशीवर टांगून ती आंदोलने यशस्वी केली आहेत.

डॉ. आंबेडकर; आपले राजकीय मतभेद असले तरी श्री. इंदिरा गांधी ह्या सामान्य उमेदवाराकडून पराभूत झाल्या. परंतु ते दोघे राष्ट्रपुरुष म्हणून ओळखले जातात. त्यामुळे झालेले तत्कालिक मतदान स्वतंत्र भारत पक्षाचे मुल्यमापन झाले असे समजण्याचे कारण नाही. निवडणूकीत अवास्तव उमेदवार उभे केले त्यामुळे शक्ति विखुरली गेली. लोकसभेच्या निवडणूकीसाठी ठराविक मतदार संघ निश्चित करून तयारी करावी असे वाटते.

आपला निस्सीम चाहता

**अशोक शं. कालेकर**

२०३/२०४, कालेकर बिल्डिंग,
नवी पेठ, सोलापूर ५.

# लोकांना आमदार नको, आंदोलक हवेत

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत स्वतंत्र भारत पक्षाला फार मोठा पराभव पत्करावा लागला. त्याचे फक्त दोन उमेदवार विजयी होऊन विधानसभेचे सदस्य झाले. या पराजयाचे परखड विश्लेषण झाले पाहिजे.

काँग्रेसच्या एकूण भ्रष्टाचारी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रोत्साहन देणाऱ्या राजवटीला लोक कंटाळले होते. त्यांना परिवर्तन हवे होते. मतदार पर्यायाचा शोध घेत होता. स्वतंत्र भारत पक्षाने पर्याय दिला होता. तो पर्याय मतदारांना टाकाऊ वाटत नव्हता हे निश्चित; पण टिकाऊही वाटत नव्हता हेही कबूल केलेच पाहिजे. प्रत्येक मतदार संघात सत्ता, मत्ता हाती असलेला बलदंड उमेदवारांनी गर्दी केली होती. स्वतंत्र भारत पक्षाचे उमेदवार साधन सामुग्रीने कमकुवत दिसले व मतदारांनी विचार केला की यांचा टिकाव लागू शकणार नाही. यास्तव लोकांनी स्वतंत्र भारत पक्षाकडे पाठ फिरवली आणि भाजप-सेनेचा निवडून येणारा पर्याय निवडला. बहुजन महासंघाचे पानीपत होण्याचेही हेच कारण आहे. काँग्रेसला हाकलू शकणारा जबरदस्त पर्याय म्हणून भाजपसेनाजवळ केली. नाइलाजाने स्वतंत्र भारतला नाकरले.

माननीय साहेबांनी सतत दोन महिने प्रचारार्थ फिरून भाषणे केली. साहेबांनी मांडलेले विचार निश्चितच देशाला तारणारे. पण 'आज गांधीजी असते तर सेवाग्राममध्येच असते का साबरमतीला परत गेले असते?' – या प्रश्नातले मर्म किती लोकांना कळले? कळलेच नाही. उलट, बाळ ठाकऱ्यांनी आपल्या भडक भाषणांनी सर्व थरातल्या लोकांना मोहून टाकले. परिणामतः, भाजपसेनेची लाट निर्माण झाली. अर्थातच स्वतंत्र भारत ह्या लाटेत कुठल्या कुठे वहावला.

गेल्या १५ वर्षापासून शेतकरी संघटना शेतकऱ्यांच्या हितासाठी झटत आहे. या चळवळीत आपण अनेक शत्रू निर्माण केले. सत्ताधारी काँग्रेस शत्रू नंबर एक. भाजपसेना जातीयवादी म्हणून तीही शत्रू. नोकरशाहीला डिवचल्यामुळे तीही शेतकरी संघटनेला पाण्यात पाहू लागली. डंकेल प्रस्तावाचे जे जे विरोधक ते ते आपले विरोधक झाले. हे सारे शेतकरी संघटनेला चिरडण्याची संधीच पाहत होते. स्वतंत्र भारतला परास्त करून त्यांनी हेच दाखवून दिले. हिंगणघाटमध्ये साहेबांच्या पराभवाचे कारण आपले सर्व शत्रू एक होऊन आपल्याशी लढले हेच आहे.

निवडणूक झाल्यावर मी सहज एका शेतकऱ्याला विचारले, का हो आपले वामनराव (सिंदखेडराजाचे उमेदवार) येतील का निवडून? तो शेतकरी 'नाही' म्हणाला. अपक्षाचा जोर जास्त आहे म्हणाला. आणखी पुस्ती अशी जोडली की, अहो वामनराव नाही आले तरी चालतात. ते निवडून आले मग आपले आंदोलन कोण करील?' त्या शेतकऱ्याचे हे वक्तव्य विचार करण्यासारखे आहे. निवडून आला व सत्तेवर चढला की मग तो माणूस आपल्या कामाचा राहत नाही हेच त्यांनी ध्वनित केले, नाही का? तात्पर्य, लोकांना शेतकरी संघटना हवी आहे, 'स्वतंत्र भारत' नको. आंदोलक हवे आहेत, आमदार नकोत!

आणि असाच विचार सर्व शेतकरी करीत असतील तर शेतकरी संघटनेने ही फुकट हमालीच करीत राहायचे का? आणि का?

**श्री. वा. दराडे,**

तढेगांव, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा.

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 22nd April, 1995

**To**

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
April 21, 1995

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# शरद जोशी दवाखान्यातून परतले प्रकृती सुधारते आहे

११ मार्च १९९५ रोजी नागपूर मुक्कामी 'अन्जायना'च्या त्रासामुळे श्री. शरद जोशी यांना तेथील डॉ. अजीज खान यांच्या दवाखान्यामध्ये उपराचार्थ ठेवण्यात आले. डॉक्टरांच्या दोन दिवसांच्या उपचाराने शरद जोशी धोक्यातून बाहेर आले तरी पुढील पंधरा दिवस त्यांना डॉक्टरांच्या देखरेखीखालीच रहावे लागले. पुढे दवाखान्याच्या वातावरणातून बाहेर पडून आठ दिवस त्यांना ॲड. शरद बोबडे यांच्या घरी राहाण्याची परवानगी, औषधे व पथ्य यांबाबत नियम पाळण्याच्या अटीवर डॉक्टरांनी दिली.

दिनांक ५ एप्रिल १९९५ रोजी श्री. शरद जोशींना हैद्राबाद येथील 'अपोलो' या सुप्रसिद्ध हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. ६ तारखेला तेथे अँजिओग्राफीच्या साहाय्याने तपासणी केली असता हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या एका रक्तवाहिनीत गुठळी झाल्याचे आढळले. दिनांक ८ एप्रिल रोजी 'अँजिओप्लास्टी' तंत्राने ती गुठळी काढून टाकण्यात आल्याने आता रक्तप्रवाह सुरळीत चालू झाला आहे. अपोलो हॉस्पिटलमध्ये १४ तारखेपर्यंत औषधोपचार व विश्रांती झाल्यानंतर १५ एप्रिल रोजी ते आंबेठाण येथे परतले. अशक्तपणा आणि विविध गोळ्यांचा औषधोपचार यामुळे डॉक्टरांनी सक्त विश्रांतीचा 'आदेश' दिला आहे आणि त्याप्रमाणे त्यांचा दिनक्रम आखण्यात आला आहे.

सतत जनसंपर्कात राहाण्याची सवय झाल्यामुळे कोणीही भेटायला आले की ते उत्साहाने बोलत बसतात आणि त्यामुळे अशक्तपणा अधिक जाणवायला लागतो म्हणून डॉक्टरांनी नागपूर व हैद्राबाद दोन्ही ठिकाणी भेटीगाठींवर निर्बंध घातले होते. आताही, या विश्रांतीच्या काळात त्यांची भेट घेण्याच्या आग्रहाने किमान महिनाभर तरी कुणी येऊ नये; त्यांना भेटण्याची इच्छा सर्वांनाच असणार, त्यासाठी महिनाभरानंतर एखाद्या दिवशी एखादा मेळावा आयोजित करून त्यांच्या भेटीचा कार्यक्रम आखावा असा कळकळीचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

शेतकरी संघटनेच्या तसेच स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सध्या तरी श्री. शरद जोशींना भेटायला येण्याचा मोह टाळावा आणि दरम्यानच्या काळात आपापल्या भागात संघटना व पक्षाच्या बांधणीचा कार्यक्रम हाती घ्यावा.

भेटीची इच्छा अगदीच अनावर झाल्यास आपल्या शुभेच्छा व काळजी पत्राने कळवा.

शरद जोशींची तब्येत झपाट्याने सुधारते आहे. काळजी नसावी.

**सुरेशचंद्र म्हात्रे**

**हे होणार आहे पण आता थोडं थांबावं लागेल....** इकॉनॉमिक टाईम्सवरून

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८**
**एस्.टी.डी. - ०२१३५**

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**

# एकखांबी तंबू नको

१) माझ्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे कारण असे की ही निवडणूक स्वतंत्र भारत पक्षाने ज्या मूलभूत मुद्यावर म्हणजे मुक्त अर्थव्यवस्थेचे संपूर्ण समर्थन या मुद्यावर केले तो मुद्दा अजून सुद्धा फारच अस्पष्ट आहे. मुक्त अर्थव्यवस्था म्हणजे निश्चित काय हे बहुसंख्य मतदारांना समजलेलेच नाही. स्वतंत्र भारत पक्षाला मुक्त अर्थव्यवस्था म्हणजे नक्की काय अभिप्रेत आहे हे अजून अज्ञातच आहे. मला स्वतःला सुद्धा या विषयाबद्दल गंभीर अज्ञान आहे. भारताचा आतापर्यंतचा इतिहास बघितला तर अशी मुक्त अर्थव्यवस्था कदापि अस्तित्वात येऊ शकेल असे वाटत नाही. आणि तशी ती जबरदस्तीने लादण्यांत आली तर त्याचा परिणाम भीषण होऊ शकेल.

आजच्या एकूण अवस्थेला निरंकुश मुक्त अर्थव्यवस्था हा रामबाण उपाय असू शकेल असे मला प्रांजळपणे वाटत नाही. बहुसंख्य मतदारांना तसेच वाटत असावे.

सामाजिक उपयोगी कायद्यांचे स्थगितीकरण इत्यादी कार्यक्रम फार जहाल आहेत. ते सर्वसामान्य जनतेला मान्य होणे शक्य वाटत नाही.

२) माझ्या निरीक्षणाप्रमाणे स्वतंत्र भारत पक्ष हा संपूर्णपणे एक खांबी तंबू आहे. आणि हा खांब म्हणजे मा. शरद जोशी. काही कारणांनी हा खांब कोसळला तर सबंध पक्ष गारद होणार आहे. असा धोका सामान्य मतदार घेण्यास धजले नसावेत.

२) समाजवादाशी बांधिलकी असण्याबद्दल द्यावयाचे प्रतिज्ञापत्र घटनेशी प्रतारणा न करण्याच्या भूमिकेतून देण्याचे नाकारले. त्यामुळे पक्षाला निवडणूक चिन्ह मिळाले नाही. वास्तवांत असे करण्याची भूमिका फार ताणली गेली असे मला वाटते. प्रचलित समाजवाद म्हणजे फक्त कल्याणकारी राज्य (Welfare State) इतक्याच अर्थाने हा शब्द वापरायला हवा होता आणि तसे प्रतिज्ञापत्र द्यायला हवे होते. त्यामुळे या पक्षाला एकसंघ फळी संपूर्ण राज्यभर उभी करता आली असती आणि कदाचित इतका दारुण पराभव झाला नसता.

३) सर्व कर्जे माफ करण्याची घोषणा आकडेवारने सिद्ध केले नाही तर केवळ एक लोकप्रिय (populist) घोषणा ठरते, एवढेच. अशा घोषणांना मतदार कितपत भाळतात हा अभ्यासाचा विषय ठरावा.

स्वतंत्र भारत पक्षाच्या आणि शेतकरी संघटनेच्या High Command ने या पराजयाचे कसे मूल्यमापन केले आहे हेही मला जाणून घ्यायला आवडेल.

**गोपाळ मो. परांजपे**
द्वारा शारदा मोटर वर्क्स
अल्फा लावल कंपनीसमोर,
कासारवाडी, पुणे - १२

# प्रचाराची बाजू लंगडी

यावेळची निवडणूक ही अनेक तऱ्हेनी वेगळी अशी निवडणूक होती. मा. शेषन यांनी लागू केलेल्या आचार-संहितेमुळे मतदारांशी संपर्क साधतांना बऱ्याच अडचणी आल्या. त्यामुळे निवडणूकी पूर्वीच्या वातावरणावरून 'जनमत' कुठे जाणार आहे याची निश्चित कल्पना करणे कठीण होते. भा.ज.प.सेना युतीला पण आपणांस एवढे मतदान होईल याची कल्पना नसावी.

१) स्वतंत्र भारत पक्षाला मतदारांनी नाकारले हा प्रश्न थोडा वेगळ्या तऱ्हेनी मांडता येईल. खरं म्हणजे 'नकार' तेव्हा समजता येईल की स्वतंत्रभारताचा-विचार-भूमिका-जाहिरनामा सर्व मतदारांपर्यंत 'समजेल' अशा माध्यमातून गेला. मतदारांनी तो समजावून घेतला आणि नंतर 'नाकारले' तर तो नकार आपण समजू शकतो. वस्तुस्थिती अशी आहे की सर्वसामान्य मतदाराला 'स्वतंत्र भारत' पक्ष हा शेतकरी संघटनेचा राजकीय पक्ष आहे या पलिकडे फारशी माहिती नाही. स्वतंत्र भारत पक्ष हा शेतकरी संघटनेचाच पक्ष आहे हा विचार एवढ्या प्रकर्षाने मांडला गेला की आम्हाला शेतकरी संघटनेची जी कांही बरीवाईट माहिती आहे ती आहे. त्यामुळे आम्हाला स्वतंत्र भारत पक्षाबद्दल वेगळा विचार करण्याची गरज भासत नाही अशी सर्वसाधारण मतदाराची भूमिका होती.

२) खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारा 'स्वतंत्र भारत' पक्ष अशी प्रतिमा आपण कांही प्रमाणात निर्माण करू शकलो तरी भ्रष्टाचार आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण या मुद्यांपुढे तो थोडा गौण ठरला. मतदारांनी अर्थव्यवस्थेला प्राथमिकता न देता भ्रष्टाचार आणि राजकारणाच्या गुन्हेगारीला अधिक प्राधान्य दिले.

३) सत्ताधारी पक्षावर हल्ला चढवितांना जो काही जोम वा आक्रमकता असायला हवी होती जेणे करून सत्ताधारी पक्षाला पुरून उरणारा पक्ष अशी प्रतिमा निर्माण व्हायला हवी होती. ती होऊ शकली नाही.

४) संघटनेचे जेवढे कार्यकर्ते आहेत त्यांनी संघटनेचा विचार पूर्ण आत्मसात केला आहे किंवा त्यांना तो पटला आहे; पण हा विचार फैलावण्यासाठी जी एक साखळी तयार व्हायला हवी ती झाली नाही. कार्यकर्त्यांना आपण विचारांशी एकनिष्ठ आहोत यांतच धन्यता मानण्याची सवय लागली. त्यामुळे संघटना वा पक्ष वाढावा असे प्रयत्न कमी झाले.

५) या निवडणुकीत 'लेखा-जोखा' हा एवढा हुकूमाचा एक्का हातात असताना या साऱ्या संकल्पनेची राबवणी एवढ्या गलथानपणे झाली की लोकांनी पण हा इश्यू फारसा गांभीर्याने घेतला नाही. 'लेखा जोखा' फॉर्मच्या बाबतीत वस्तुस्थिती आणि कळविलेली माहिती यांत प्रचंड तफावत असण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेत्यांना नेमकं काय चाललंय याची कल्पना आली नाही.

६) या निवडणुकीत लोकांशी

संपर्क साधण्याचे एक प्रभावी साधन म्हणून वर्तमानपत्रांनी बजावलेली भूमिका अत्यंत निराशाजनकच नव्हे तर विकृत होती. पेडन्यूजमुळे तर बातम्या खऱ्या असून सुद्धा छापून येणे दुरापास्त झाले. सर्वसामान्य मतदाराला या खाचाखोचा कळत नाहीत. म्हणून ज्याच्या बातम्या अधिक आणि अतिरंजित तो पक्ष 'जोरांत' अशी हवा निर्माण केली गेली.

७) स्वतंत्र भारत पक्षाचे उमेदवार हे बव्हंशी नवखे होते. राजकारण आणि निवडणूक ही पहिलीच वेळ असल्यामुळे सराईत उमेदवार आणि पक्ष यापुढे ते टिकू शकले नाहीत.

८) निवडणूक जिंकणे हे एक तंत्र आहे. निव्वळ विचार चांगला म्हणून लोक मत देतात एवढी प्रगल्भता अजून लोकांमध्ये झालेली नाही. आपले मत वाया जाऊ नये म्हणून जिंकणाऱ्या उमेदवारालाच मत द्यायचे अशी धारणा ज्या मतदारांत आहे त्यांच्याकडून चांगल्या विचारांना प्रतिसाद कसा अपेक्षायचा? एकदा घाण रहायची संवय झाल्यावर आंघोळीचा पण कंटाळा येतो. स्वच्छतेची भीती वाटायला लागते तसाच कांहीसा हा प्रकार आहे

९) स्वतंत्र भारत पक्ष हा शेतकरी संघटनेचा पक्ष आहे त्यामुळे त्याचा शहरी जनतेशी काही संबंध नाही असा प्रचार केला गेला.

१०) निकालानंतर त्रिशंकू विधानसभेची शक्यता वर्तवतांना, काँग्रेस अपक्ष आणि स्वतंत्र भारतसारख्या (जातीयवादी पक्षांना शत्रू नं. १ मानणाऱ्या) पक्षांबरोबर हातमिळवणी करून सरकार बनवली अशी शक्यता मतदारांना वाटली असावी. कुठल्याही प्रकारे काँग्रेस नको या नकारात्मक भूमिकेतून पण स्वतंत्र भारत पक्ष अव्हेरला गेल्याची शक्यता वाटते.

**डॉ. गिरीधर पाटील**

शिवाजी रोड, नाशिक ४२२ ००२.

# २००० साल येणार आहे

**मा. शरद शरद जोशी यांसी**

**सप्रेम सलाम**

आपली तब्बेत बिघडल्यामुळे प्रसार माध्यमाद्वारे वाचले, ऐकले. ऐन मतमोजणीच्या वेळेस असे घडल्याने जरा चिंता वाटली. राजकिय विरोधकांनी म्हणण्यापेक्षा टवाळखोरांनी या गोष्टीची पण टवाळी केली आणि मनोमन वाटू लागले आपला नेता खरोखरच इतक्या कच्या दिलाचा आहे का? याही परिस्थितीत टवाळखोरांना त्यांची टवाळी कशी बावळटपणाची आहे. याची जाणीव करून दिली. तरीही मन खात होत. आपलं पानिपत का झालं? व्यक्तिगत तुमच्याबद्दलचं माझं हे मत नाही तर सर्व ठिकाणी आपली परिस्थिती अशी का झाली मनामध्ये जी स्वप्न रंगवली होती त्याचा चकाचूर झाला असं वाटलं. तरीही धीर सोडलेला नाही. अशा आहे. शेवटी आशेवर माणूस जगतो.

गेली १२/१५ वर्षे आपण सर्वजण शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आंदोलन करत आलो कधी यश आलं तर कधी अपयश. अधिवेशने आणि मेळावे भरवून लोकसमुदायाचा सागर निर्माण केला. एक नवीन भूमिका घेऊन स्वतंत्रपणे असा वेगळा विचार मांडत नवीन तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न या चळवळीतून झाला. लोक आंदोलने उभी करून आपण आपला विचार सैद्धांतिक पातळीवर जगन्मान्य केला. यशाची एक-एक पायरी चढत असताना, लोकमनाची प्रचंड सहानुभूती असताना मतपेटीतून ती का मिळाली नाही याचं कोडं मात्र उलगडत नाही.

आपण कमी कुठे पडलो याचा शोध घेऊन नवीन रणनीती तयार करणे आता शक्य आहे. आपण सर्वांनी मिळून उभा केलेला स्वतंत्र भारत पक्ष याची घडी व्यवस्थित बसविणे आवश्यक आहे. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आपण ग्रामीण भागात पोहचलो. परंतु कोणत्या शहरातून आपण कार्यकर्त्यांची फळी उभी करू शकलो नाही. स्वतंत्रपणे उभा राहिलेला स्वतंत्र भारत पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांची अपूरी टीम घेऊन मैदानात उतरला परंतु त्याला स्वतःची टीम नव्हती ती टीम तयार करावी लागेल. शेतकरी संघटनेचा विचार व्यापक असला तरी यंत्रणा मात्र अपूरी आहे. स्वतंत्र भारत पक्षाला आपली यंत्रणा उभी करावी लागेल आणि हे काम आता वेगाने होणे आवश्यक आहे. शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष हे एकमेकाला पूरक आहेत अस मी मानतो. म्हणून या दोन्ही संघटनांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. म्हणूनच प्रत्येक गावात, तालुक्यात, जिल्ह्यात आणि राज्यात दोघांमध्ये समन्वय असणारी कृतिकर्त्यांची फळी उभी करणे गरजेचे आहे. काम अवघड असले तरी त्याला पर्याय नाही. संपलेली विधानसभा इतिहास जमा करून येणारी लोकसभा ही पक्ष बांधणीच्या दृष्टीने उपयोगी करून घेत २००० सालाच्या ध्येयाचे स्वप्न उराशी बाळगून साधननिर्मिती करून साध्याकडे वाटचाल सुरू ठेवणे अगत्याचे आहे.

बस, मला एवढेच म्हणावयाचे आहे मी खचलेलो नाही, आपणही खचू नये. येणाऱ्या परिस्थितीवर लक्ष ठेवत नवीन प्रकारची रणनीती आखत आपण सर्वजण त्या क्षितीजाच्या पलिकडे जाण्याचा प्रयत्न करू या. म्हणतात ना? राखेतून फिनिक्स पक्ष जन्म घेऊन उंच अशी भरारी मारतो. आपली राख झालेली नाही. आपण सर्वजण अंगार आहोत. या निवडणुकीने त्या अंगारावर थोडी राख साचली तिला आता आपण सर्वजण पुन्हा एकदा जोराची फुंकर मारून उडवून लावू या आणि त्या अंगारातून ज्वाला भडकवू या. विजय आपलाच आहे. कारण आपला मार्ग योग्य आहे. २००० साल येणार आहे. त्याच्या स्वागताच्या तयारीला सुरुवात करू या.

**सिराज शेख**

मु. आंबीरखालसा

पो. घारगाव, ता. संगमनेर,

जि. अहमदनगर.

(९)

स्वतंत्र भारत पक्षाची घोषणा निवडणुकीच्या तोंडावर दि. १२ नोव्हेंबर १९९४ ला नागपूर येथे झाली. पक्षाचे अजून सभासद सुद्धा झाले नसतांना पक्षांच्या नावावर दोन आमदार निवडून येणे म्हणजे मतदारांनी नाकारणे नव्हे, स्वीकारणे होय.

याला मी पराभव समजत नसून विजयाची सुरुवात समजतो.

**मुरलीधर पुंडलिकराव ठाकरे**

मु. सोनेगांव, जि. नागपूर